Solapur Commune"

# सोलापूर कम्यून

१९३० सालची ही गोष्ट आहे. गोष्ट राजा राणीची नाही तर गोष्ट आहे कामगारांच्या राज्याची. हे राज्य चालले ६–७ दिवस, पण त्या थोड्या दिवसात खूप काही शिकवून गेलं. १९३० साली भारतात, सोलापूरात हे राज्य स्थापन झालं तरी कसं, त्याच्या बद्दलचे सादप्रतिसाद उमटले कसे आणि कुठे ह्याची ही गोष्ट आहे.

१९३० साली गांधींनी अहिंसक सविनय आज्ञाभंगाची चळवळ सुरू केली होती. आज्ञाभंगाची चळवळ हा साम्राज्यवादाविरुद्धचा लढा समजून भारतातील कामगार, शेतकरी व मध्यमवर्गीय त्यामध्ये सहभागी झाले होते. १९२९ साली भारतातील कामगार चळवळीला फार मोठा तडाखा बसला होता. कामगार संघटनेच्या सर्व प्रमुखांना पकडून मीरत येथे त्यांच्यावर राजद्रोहाचा आरोप ठेवून त्यांच्यावर खटला चालू होता. सविनय आज्ञाभंगाची चळवळ चालू झाली आणि त्याला पहाता पहाता जोर चढला. गांधीजींच्या दांडी-यात्रेनंतर चळवळीला उग्र स्वरुप आले. ठिकठिकाणी उत्स्फूर्त संप झाले. देशभर प्रखर व उग्र निदर्शने होऊ लागले. लाठी आणि बंदुकीच्या गोळ्यांचा भडिमार करून हे आन्दोलन चिरडण्यासाठी राज्ययंत्रणा वेडीपिशी झाली होती. अशातच गढवाली सैनिकांनी, पेशावरला चाललेल्या निदर्शनांत भाग घेणाऱ्या लोकांवर गोळीबार करण्यास नकार दिला व ब्रिटिशांना आपसातच चेकाळवाले. ब्रिटिशांनी गांधीजींना ५ मेला अटक केली. ह्याच्या निषेधार्थ संपाची व हरतालांची एक प्रचंड लाट उसळली.

सोलापूरचे ५० हजार कापड गिरणीतले कामगार ब्रिटिशांच्या ह्या अत्याचाराचा निषेध करण्यासाठी उठले. सगळीकडे चाललेला हा थैमान ते स्वस्थ बसून थोडेच पाहू शकणार होते? त्यांनी ८ मेला एकत्र येऊन एक प्रचंड मोर्चा काढला. ब्रिटिश सरकारच्या पोलिसांनी त्यांच्यावर हल्ला केला. कामगारांनी त्यांना दगड विटांनी उत्तर दिले. पोलिसांनी गोळीबार केला. ही लढाई जवळ जवळ दोन अडीच तास चालली होती. पण बंदुकांसमोर दगडाविटांचा किती काळ टिकाव लागणार? आठ पोलिसांचा बळी घेऊन व पाच कामगारांना गमावून कामगारांनी माघार घेतली. इतर अनेक लोक जखमी झाले.

ह्या घटनेनंतर ५० हजार कामगार खवळून न उठतील तरच नवल. अहिंसक व शांततापूर्ण मार्गी काँग्रेस पुढाऱ्यांना मागे सारून कामगारांनी नेतृत्व आपल्या हाती घेतले. प्रत्येक पेठेत संघर्ष समितीची स्थापना झाली. निवडून दिलेल्या नेत्यांची व कार्यकर्त्यांची केंद्रीय संघर्ष समिती स्थापन झाली. सोलापूरचे लोकप्रिय कामगार नेते मल्लाप्पा धनशेट्टी, अब्दुला रसूल, कोरबान हुसेन इत्यादिनी केंद्रीय समितीचे नेतृत्व केले. ह्याच समितीच्या नेतृत्वाखाली कामगार युवकांची 'लाल फौज' उभारली गेली. ब्रिटिशांना हाकून लावून कामगारांचे, जनतेचे राज्य स्थापन करण्याकरता तयारी झाली.

सरकारी कार्यालये, पोलिस ठाणी, विदेशी दारुची दुकाने, इंग्रजी व्यापाऱ्यांची दुकाने यावर हल्ले करून ती जाळून टाकण्यात आली. कामगारांनी कारखाने, गिरण्या आपल्या ताब्यात घेतल्या. शहरातील मिल मालक, ब्रिटिश अधिकारी व कर्मचारी व ब्रिटिशांचे भारतीय दलाल ह्या चळवळीची पाचावर धारण बसली. हे सर्व शहर सोडून पळाले व रेल्वे स्टेशनमध्ये त्यांनी आश्रय घेतला. त्यांच्या रक्षणार्थ सैनिकांनी व पोलिसांनी स्टेशनाभोवती कडे घातले. एखाद्या राजमहालाप्रमाणे मशिनगनच्या सहाय्याने पोलिस स्टेशनचे रक्षण करण्यात आले. एक संपूर्ण दल ह्यांच्या रक्षणार्थ सज्ज होते.

सोलापूर शहर आता कामगारांच्या ताब्यात होते. शहरामध्ये सर्वत्र प्रमुख रस्त्यावर, सरकारी इमारतींवर राष्ट्रीय झेंडे फडकत होते. संघर्ष समितीने थोडयाच अवधीत शासन यंत्रणा उभी केली. नित्याचे कार्यक्रम व्यवस्थितपणे चालले होते. गाडयांचे येणे जाणे, पाण्याची व्यवस्था, शांतीरक्षा सर्व चालू होते. कामगारांची लाल सेना शहरात शांतता व सुव्यवस्था राखण्यात मदत करत होती. हे सर्व पाहून 'पूना स्टार'ने आपल्या बातमीपत्रात लिहिले— 'कामगारांनी शासन व्यवस्था संपूर्णपणे आपल्या ताब्यात घेतली. आपले कायदे कानू अमलात आणण्याचा त्यांनी प्रयत्न केला'.

भारतातील हे पहिलेच खरेखुरे कामगारांचे राज्य सोलापूरमध्ये फक्त सहा-सात दिवसच टिकू शकले. त्यानंतर ब्रिटिश फौजांचा हल्ला सुरु झाला. पेशावरला गढवाली सैनिकांनी लोकांवर हल्ला करण्यास नाकारले होते, ह्यातून धडा शिकून सोलापूरवर भारतीय फौज पाठविण्याची हिम्मत सरकारला झाली नाही. 'यॉर्कशायर रायफल' सेनेची एक रेजिमेंट व किंग्ज अलस्टर रायफल'ची एक बटॅलियन सोलापूरपर ताबा मिळविण्याकरिता पाठविण्यात आली. जवळजवळ तीस हजार ब्रिटिश सैनिक रायफली व मशिनगन्स घेऊन सोलापुरात घुसले. लाल फौज सामना देण्यासाठी तयार होती. शहराच्या सर्व बाजूनी मोठ मोठे पाईप, झाडे, बैलगाडया इत्यादींचे 'बॅरिकेडस्' उभे केले गेले. १२ मेला 'मार्शल लॉ' जारी करण्यात आला. शहरातील मुख्य सडकेवर घनघोर युद्ध सुरु झाले. १२ ते १६ मे लढाई सुरू होती. रस्त्यावर अक्षरशः रक्ताचे पाट वहात होते. बंदुकांपुढे दगड विटा व माणसे किती वेळ टिकाव धरणार ? शेवटी कामगारांना हार खावी लागली. सात दिवसांच्या कामगार सत्तेचा-सोलापूर कम्यूनचा शेवट झाला. अशा प्रकारचे बॅरिकेडस्ना तोंड देण्याची सवय ब्रिटिशांना नव्हती. ते ही ह्यातून बरच काही शिकून गेले, व हे त्यांनी मान्य केले.

युद्ध संपले ! सोलापूरचे युद्ध संपले असेल. पण खरे युद्ध, खऱ्या स्वातंत्र्यासाठी लढा येथूनच सुरु झाला हे सर्व सूज्ञांनी जाणले. युद्धानंतर कामगार राज्याच्या सर्व नेत्यांना पकडण्यात आले. सोलापूरच्या मुख्य रस्त्यावर ३० कामगार नेत्यांना फाशी दिली गेली. सैनिकी कोर्टात २०० कामगारांना भरपूर कैदेची शिक्षाही झाली. कामगारांचा महान त्याग, त्यांची स्वप्ने हेही त्यांच्याबरोबरच गाडले जातील अशी अपेक्षा ब्रिटिशांनी धरली. पण कामगाराच्या प्रत्येक रक्ताच्या थेंबाचा बदला घेण्याची इच्छा लाखो मनात निर्माण झाली.

ह्या घटनेचा प्रतिसाद कुठेही उमटू न देण्यासाठी ब्रिटिशांनी खूप प्रयत्न केले. पण सत्याची कितीही मुस्कटदाबी केली तरी ते डोके वर काढणारच!

ह्या घटनेचे प्रतिसाद इंग्लंडमध्येही उमटले. यॉर्कशायर रायफल तुकडी सोलापूरात पाठविल्याची बातमी प्रसिद्ध होताच यॉर्कशायरच्या कापड गिरणीतील कामगारांनी सोलापूर कामगारांना पाठिंबा दर्शवून सरकारचा जाहीररित्या निषेध केला.

भारतीय वर्तमानपत्रात सोलापूर मधील घटनावृत्त प्रसिद्ध करण्याबाबत कडक निर्बंध घालण्यात आले. सोलापूरच्या पन्नास हजार कामगारांची एकता, अभूतपूर्व संग्राम व कामगार राज्य स्थापना या बातम्या प्रसिद्ध होणे ब्रिटिश सरकारच्या दृष्टीने अत्यंत धोक्याचे होते. देशभर प्रखर आंदोलन सुरु होते. व १९२८ च्या कामगार चळवळीची, संपाची आठवण सरकार विसरले नव्हते. तरीही बातमी पसरलीच. आजूबाजूच्या ठिकाणी सोलापूर कामगारांच्या समर्थनार्थ सभा निदर्शने झाली. मुंबईमध्येही सोलापूरला सशस्त्र सैनिक पाठविल्याच्या निषेधार्थ व सोलापूर कामगारांना पाठिंबा दर्शविण्यासाठी सभा झाल्या.

संपूर्ण भारतावर ब्रिटिशांचे राज्य असताना एखाद्या सोलापूरमध्ये अशा प्रकारचे कम्यून फार काळ टिकणे अशक्य होते. पण असफलतेतून मिळालेले शिक्षण सफलतेइतका महत्वपूर्ण ठरू शकते.

फ्रान्समध्ये पॅरिस कम्यूनचा उठाव झाला होता तेव्हा स्वर्गाचा नाश करायला निघालेली शक्ती अशी त्याची वदनामी करण्यात आली होती. पण खरा स्वर्ग कुठला हे स्वतः कामगारांनी ठरवायचे आहे.

'समता', 'न्याय' आणि 'बंधुत्व' यावर अधिष्टीत 'स्वराज्य' हाच कामगारांचा स्वर्ग. तो पृथ्वीवर आणण्यासाठी सशस्त्र उठाव करून आपल्या राजकीय आर्णांवाना प्रत्यक्ष कृतीची जोड देण्याची कुवत आणि 'स्वराज्य' व्यवस्थितरित्या चालवण्याची क्षमता बाणविण्याचे महत्व 'सोलापूर कम्यून'चा अनुभव शिकवून गेला हे त्याचे श्रेय. ('निर्माण'वरून अनुवादीत)